ePaper
राष्ट्रवादी, ठाकरे गटाचे 13-14 आमदार आमच्याकडे येणार : उदय सामंत

वर्ष - 6 । अंक - 330 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- दौंड तालुक्याचं राजकारण तापलं
- थकित मिळकतकर वसुलीचा नवा फंडा!
- खेडमध्ये एकनाथ शिंदेंचा ठाकरेंवर घणाघात
- भाजपला धोक्याची घंटा!

www.mahaenews.com | सोमवार, दि. 20 मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# भाजपाचे मिशन 2024!

## भाजपाकडून विधानसभेच्या 288 आणि लोकसभेच्या 48 जागांची तयारी

**। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शंकरराव मासुळकर अर्बन हेल्थ सेंटर व आय रुग्णालय, भोसरी गवळीमाथा आणि कासारवाडीतील कचरा हस्तांतरण केंद्राचे पाटील यांच्या हस्ते रविवारी उद्घाटन झाले. भारतीय जनता पार्टी एक निवडणूक झाली की पुढच्या निवडणुकीची तयारी करत असते. त्यानुसार गेल्या काही महिन्यांपासून राज्यातील विधानसभेच्या २८८ आणि लोकसभेच्या ४८ जागांची आम्ही तयारी करत आहोत.

शिवसेनेच्या वाट्याला किती जागा येतील, हे आता ठरवण्याचे काही कारणच नाही. त्यांना आमची तयारी उपयोगी पडेल, असे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शंकरराव मासुळकर अर्बन हेल्थ सेंटर व आय रुग्णालय, भोसरी गवळीमाथा आणि कासारवाडीतील कचरा हस्तांतरण केंद्राचे पाटील यांच्या हस्ते रविवारी उद्घाटन झाले.

भाजप शहराध्यक्ष आमदार महेश लांडगे, आमदार अश्विनी जगताप, उमा खापरे, प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार आदी उपस्थित होते. विरोधकांच्या श्रेयवादाच्या फलकबाजीवर माध्यमांशी बोलताना चंद्रकांत

> **» बावनकुळेंनंतर चंद्रकांत पाटील यांचं मोठं विधान**
>
> **» शिवसेनेच्या वाट्याला किती जागा येतील, हे आता ठरवण्याचे काही कारणच नाही**

पाटील म्हणाले, प्रत्येकाला आपली भूमिका असते. तशी विरोधकांना विरोधकांची भूमिका असते. त्यांनी कुठल्याही चांगल्या गोष्टीमधून सुद्धा दुर्बीण लावून एखादा छोटा मोठा दोष शोधायचा असतो. वायसीएमधील नेत्र विभाग येथे स्थलांतरित केला जाणार आहे. या नवीन इमारतीत डोळ्यांशी संबंधित सर्व आजारांची तपासणी, शस्त्रक्रिया होतील. उद्यापासून कामकाज सुरू होईल.

जुनी पेन्शनबाबत सकारात्मक

जुनी पेन्शनच्या मागणीसाठी सरकारी कर्मचाऱ्यांच्या संपाचा सहावा दिवस असून त्याबाबत अद्याप तोडगा निघाला नसल्याबाबत विचारले असता पाटील म्हणाले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पेन्शनबाबत सकारात्मक असल्याचे वारंवार सांगितले आहे.



### विविध विकास कामांची उदघाटने

» भाजपा अनेक महिन्यापासून निवडणुकीची तयारी करत आहे. विधानसभा आणि लोकसभेची तयारी सुरू आहे. शिवसनेच्या वाट्याला ज्या जागा जातील हे आत्तापासून ठरवण्याचे काही कारण नाही. त्यांना आमची तयारी उपयोगी पडेल असे विधान पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले आहे. संपाबाबत राज्यसरकार सकारात्मक आहे. परंतु, परीक्षार्थी आणि रुग्णांना वेठीस धरणे चुकीचे आहे. अत्यावश्यक सेवामधील कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून काम करावं आणि बाकी कर्मचाऱ्यांनी संप करावा असा देखील त्यांनी म्हटलं आहे. ते पिंपरीत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पिंपरी- चिंचवड शहरातील विविध विकास कामांची उदघाटने करण्यात आली.

# अंगभर कपडे घालून लावणीचे सादरीकरण कर!

## » लावणीसम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांचा गौतमी पाटीलला सल्ला

**। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

आता लावणी नव्हे 'डीजे शो' चालला आहे. लावण्याचे व्यवस्थित सादरीकरण होत नाही. पारंपरिक बाज ठेवला जात नाही. आता लावणीचे सादरीकरण करणारे शिकायला तयार नाहीत. लावणीची विटंबना होत असताना मनाला दुख वाटत असल्याची खंत



लावणीसम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांनी व्यक्त केली. लावणी कशी असते ही दाखविण्याची वेळ आली आहे. ज्याच्या त्याच्या हिशोबाने जे ते पोट भरत असल्याचे सांगत गौतमी पाटील यांच्यावर बोलताना अंगभर कपडे घालून लावणीचे सादरीकरण करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आमदार उमा खापरे, महापालिकेच्या माजी विरोधी पक्षनेत्या सुलभा उबाळे यांच्या वतीने चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात २५ आणि २६ मार्च २०२३ रोजी महालावणी स्पर्धा आयोजित केली आहे. त्याबाबतची माहिती देण्यासाठी आलेल्या पत्रकार परिषदेत सुरेखा पुणेकर बोलत होत्या.

### खरी कला शिकावी

»वयाच्या आठव्या वर्षी मी या क्षेत्रात आले. शाळा मला माहिती नाही. लावणीसाठी मी योगदान दिले. लावणी लोक बघत नव्हते. महिला पुरुषांना लावणी पाहण्यासाठी पाठवत नव्हते. मी लावणी परदेशापर्यंत पोहोचवली. लावणी टिकली पाहिजे. महिलांनी बघितली पाहिजे. लावणीने मला घडविले. आता लावणीची विटंबना होत असताना मनाला दुःख वाटते. प्रत्येक ठिकाणी लावणीची विटंबना होत आहे. लावणीचे व्यवस्थित सादरीकरण होत नाही. लावणीचा पारंपरिकपणा जपला जात नाही.आता जे चालले आहे. त्याला लावणी न म्हणता डीजे शो चालला आहे. लावणीचा वेगळाच प्रकार आल्याची खंत सुरेखा पुणेकर यांनी व्यक्त केली. अंगभर कपडे घालून लावणीचे सादरीकरण करावे. खरी कला शिकावी अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केला.

# दौंड तालुक्याचं राजकारण तापलं!

## संजय राऊतांनी बॉम्ब फोडताच तालुकाभर आभार आणि निषेधाचे समोरासमोर बॅनर

। पुणे। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी काही दिवसांपूर्वी दौंडमधील भाजप आमदार राहुल कुल यांच्यावर गंभीर आरोप केले. कुल यांच्या नेतृत्वाखालील भीमा पाटस सहकारी साखर कारखान्यात ५०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा दावा राऊत यांनी केला. राऊत यांच्या या आरोपाचे पडसाद दौंडच्या राजकारणात उमट असल्याचे पाहायला मिळत असून त्यांच्या निषेधाचे आणि आभाराचे बॅनरही दौंडमध्ये झळकू लागले आहेत.**

भीमा पाटस कारखान्याचे अध्यक्ष राहुल कुल यांच्यावर १३ मार्च रोजी संजय राऊत यांनी ५०० कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. त्यामुळे राहुल कुल हे अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली. मात्र राऊत यांनी केलेले सर्व आरोप बिनबुडाचे असल्याचे म्हणत दौंड शहरात राहुल कुल समर्थकांनी संजय राऊत यांचा निषेध व्यक्त करत त्यांच्या प्रतिमेचे दहन केले. आमदार कुल समर्थकांच्या या कृतीला त्यांचे कट्टर राजकीय प्रतिस्पर्धी असलेल्या राष्ट्रवादीचे माजी आमदार रमेश थोरात यांच्या समर्थकांनीही जोरदार प्रत्युत्तर दिलं.

'भीमा पाटस सहकार कारखान्यातील ५०० कोटी रुपयांच्या गैरव्यवहार आणि भ्रष्टाचाराला संजय राऊतांनी वाचा फोडली आहे. कर नाही त्याला डर कशाला, चौकशीला सामोरे जा... राऊत यांचे जाहीर आभार' असा मजकूर लिहिलेले बॅनर शहरात लावण्यात आले. मात्र राऊत यांचे आभार मानणाऱ्या या बॅनरशेजारीच राहुल कुल समर्थकांनी पुन्हा संजय राऊत यांच्या निषेधाचे बॅनर लावले आहेत. एकंदरीत, संजय राऊत यांच्या गंभीर आरोपानंतर दौंडमधील सत्ताधारी आणि विरोधी गट आमने-सामने आल्याचं चित्र असून या कारखान्यातील कथित भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलंच ढवळून निघालं आहे.

### संजय राऊत यांचा निषेध

**» भीमा पाटस कारखान्याचे अध्यक्ष राहुल कुल यांच्यावर १३ मार्च रोजी संजय राऊत यांनी ५०० कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. त्यामुळे राहुल कुल हे अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली. मात्र राऊत यांनी केलेले सर्व आरोप बिनबुडाचे असल्याचे म्हणत दौंड शहरात राहुल कुल समर्थकांनी संजय राऊत यांचा निषेध व्यक्त करत त्यांच्या प्रतिमेचे दहन केले.**




# राज्यात ग्रामीण भागातही एसटीच्या ई-बस चालविणे होणार शक्य!

## 172 ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार

। पुणे। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून इलेक्ट्रिक बसची सेवा ग्रामीण भागापर्यंत पोहोचावी; म्हणून राज्यात १०१ डेपो व इतर अशा १७२ ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातही एसटीच्या ई-बस चालविणे शक्य होणार आहे.**



### ई-बसची वैशिष्ट्ये...

- » ई-बसची प्रवासी क्षमता : ४२
- » एक वेळेस चार्जिंग केल्यानंतर ३०० किलोमीटर धावणार.
- » बस पूर्ण वातानुकूलित असणार.
- » बसमध्ये चार्जिंग सुविधा असणार.
- » स्वयंचलित दरवाजे.

राज्याचा २०२३-२४चा अर्थसंकल्प नुकताच सादर झाला. यात राज्य परिवहन महामंडळासाठी नवीन पाच हजार १५० ई-बस खरेदी करणार असल्याची घोषणा केली होती. अर्थमंत्र्यांच्या घोषणेनंतर दुसऱ्या दिवशीच या बसखरेदीची प्रक्रिया सुरू झाली. एसटी महामंडळाने नऊ मीटरच्या २,३५० आणि १२ मीटरच्या २,८०० ई-बसची निविदा काढली.

या ई-बससाठी एसटी महामंडळाने १०१ डेपोंमध्ये १७२ ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारण्याचा निर्णय घेतला आहे. ही चार्जिंग स्टेशन कंत्राटदारांनीच बांधायची आहेत.

त्याची देखभाल, दुरुस्तीही कंत्राटदाराने करायची आहे. या बस पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर या शहरांसह ग्रामीण भागातही धावणार आहेत, अशी माहिती एसटीचे व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांनी दिली. 'राज्य सरकारने महिला प्रवाशांना एसटीच्या प्रवासात ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतल्यामुळे फायदा होणार आहे. यामुळे एसटीकडे प्रवासी वाढणार आहेत,' असे एसटीचे व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांनी सांगितले.

# चाकण एमआयडीसी परिसरातील ३० उद्योगांचा वीजपुरवठा खंडित!

## तांत्रिक उपाययोजना झाल्यानंतर पर्यायी व्यवस्थेतून सुरू

। पुणे। महाईन्यूज ।

**अज्ञात वाहनाने ३३ केव्ही डबलसर्किट वीजवाहिन्यांच्या खांबाला रविवारी (१९ मार्च) पहाटे एकच्या सुमारास धडक दिली. यामध्ये वीजखांबासह वाहिन्या जमीनदोस्त झाल्या. त्यामुळे चाकण एमआयडीसी परिसरातील ३० उद्योगांचा वीजपुरवठा खंडित झाला होता. त्यानंतर महावितरणकडून तातडीने पर्यायी वीजपुरवठ्यासाठी तांत्रिक उपाययोजना करून दुपारी सर्व औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठा सुरू केला.**



### महावितरणकडून फौजदारी फिर्याद दाखल

**» जमीनदोस्त झालेल्या वीजखांबाची उभारणी, वीजवाहिन्यांची जोडणी तसेच डिस्क इन्सूलेटर बदलण्यासह इतर कामे सुरु करण्यात आले असून सायंकाळपर्यंत सर्व कामे पूर्ण होणार आहेत. दरम्यान, वीजखांबाला धडक देऊन नुकसान करणाऱ्या अज्ञात वाहनचालकाविरुद्ध महावितरणकडून फौजदारी फिर्याद दाखल करण्यात येत आहे.**

महापारेषणच्या चाकण १३२ केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्रातून ह्युंदाई-कॉर्निंग ३३ केव्ही डबल सर्किट वीजवाहिनीद्वारे चाकण एमआयडीसी फेज दोनमधील उद्योगांना वीजपुरवठा केला जातो. मात्र, या वीजवाहिनीच्या खांबाला आंबेठाण रस्त्यावर अज्ञात वाहनाने पहाटे एकच्या सुमारास धडक दिली. नंतर चालक वाहनासह पळून गेला. मात्र, या धडकेत वीजखांब व डबल सर्किटच्या वीजवाहिन्या जमीनदोस्त झाल्याने चाकणमधील ३० उद्योगांचा वीजपुरवठा खंडित झाला.

महावितरणचे उपकार्यकारी अभियंता विजय गारगोटे, शाखा अभियंता रामप्रसाद नरवडे, जनमित्र योगेश जगताप यांनी घटनास्थळी भेट देऊन इतर वीजवाहिन्यांद्वारे पर्यायी वीजपुरवठ्याची तयारी सुरु केली.

तांत्रिक उपाययोजना झाल्यानंतर सर्वच ३० उद्योगांचा वीजपुरवठा दुपारी पर्यायी व्यवस्थेतून सुरू करण्यात आला.

# थकित मिळकतकर वसुलीचा नवा फंडा!

## » डिफॉल्टर'मध्ये राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते, आगामी महापालिका निवडणुकीतील इच्छूकही

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**२०२२-२३ हे आर्थिक वर्ष संपण्यास काही संपण्यास अवघे १३ दिवस उरल्याने पिंपरी-चिंचवड (PIMPRI-CHINCHWAD) महापालिकेने थकित कर वसुली जोरात सुरु केली आहे. त्यासाठी मिळकती जप्त करण्याच्या जोडीने लाखो रुपये थकबाकी असलेल्यांची नावे त्यांनी वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्याचा धडाका सुरु केला आहे.**






या 'डिफॉल्टर'मध्ये काही राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते आणि आगामी महापालिका निवडणुकीतील इच्छूकही असल्याचे दिसून आले आहे. त्यांची नावे प्रसिद्ध होताच नाईलाजास्तव ते थकित कर भरू लागले आहेत. त्याला पालिकेच्या करसंकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांनी 'सरकारनामा'शी बोलताना आज दुजोरा दिला. या उपायानंतर करवसुली वाढल्याचे त्यांनी सांगितले. एक लाख रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्यांची नावे प्रसिद्ध केली जात असल्याची माहिती त्यांनी दिली. त्यानुसार आज थेरगाव करसंकलन कार्यालयाच्या हद्दीतील अशा थकबाकीदारांची पानभर यादी 'सकाळ'मध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे. तर, त्याअगोदर भोसरीतील हे थकबाकीदार पेपरमध्ये झळकले होते. त्यात बिल्डर, गाववाले, मोबाईल टॉवर कंपन्या अशा दिग्गज असामीही आहेत.

यापूर्वी मोठ्या मिळकतकर थकबाकीदारांच्या घरासमोर पालिकेने बॅण्ड वाजविला होता. यावेळी त्यांची नावे वर्तमानपत्रात झळकवण्याची नवी खेळी त्यांनी केली आहे. यावर्षी साडेनऊशे कोटी रुपयांचा मिळकतकर तथा मालमत्ताकर वसुलीचे पालिकेचे उद्दिष्ट आहे. दुसरीकडे फेब्रुवारीअखेरपर्यंत तो सातशे कोटी वसूल झाला आहे. म्हणजे एका मार्च महिन्यात तब्बल अडीचशे कोटींची वसूली करायची असल्याने करसंकलन विभाग जोमाने कामाला लागला आहे. थकबाकीदारांना जप्तीच्या नोटीसा देऊन त्या जप्त करीत आहेत, तर काहींचे नळजोड तोडत आहेत. सुट्टीच्या दिवशीही करसंकलन कार्यालये सुरु ठेवली गेली आहेत. पाणीपट्टी तीन महिन्यांनी दिली जाते.

### 800 कोटी, कर या महिनाअखेर गोळा करु

**» मात्र, करसंकलनाचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी शेवटच्या तिमाहीत जानेवारी ते मार्च अशी नाही, तर जानेवारी आणि फेब्रुवारी अशा दोन महिन्यांसाठीच ती देण्यात आली आहे. तसेच ती भरण्यासाठी 'ड्यू डेट' म्हणजे अवधीही देण्यात आला असून बिलाच्या तारखेच्या दिवशीच ती भरण्यास सांगण्यात आले. दुसरीकडे शास्तीकर माफी झाल्याने आता थकित मिळकतकराचा मोठ्या प्रमाणावर भरणा होऊन उद्दिष्टाच्या जवळपास पोचू, आठशे कोटी, तरी कर या महिनाअखेर गोळा करू, असा विश्वास करसंकलन विभागातून व्यक्त करण्यात आला आहे.**

---

# पंतप्रधान आवास योजनेत पिंपरी-चिंचवडमध्ये ३१ कोटी रुपयांचा घोटाळा?

## » प्रशासकही भाजप नेत्यांच्या तालावर निर्णय घेत असल्याचा राष्ट्रवादीचा हल्लाबोल

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या पंतप्रधान आवास योजनेतील घोटाळ्याप्रकरणी `ईडी` ने आज पाच ठिकाणी छापेमारी केली. पिंपरी चिंचवड महापालिकेचेही या योजनेत जनतेच्या ३१ कोटी रुपयांची लूट झाल्याचा आरोप करीत, त्याबाबत `ईडी`चौकशी करण्याची मागणी आज करण्यात आली.**



पिंपरी पालिकेच्या या योजनेत ११९० घरांसाठी फक्त दोनच निविदा आल्याने त्यात ठेकेदारांनी रींग करुन संगनमत केल्याचे स्पष्ट दिसते आहे, असा दावा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केला. १४२ कोटींचे हे काम तब्बल ३१ कोटी रुपये जादा दराने १७३ कोटी ५८ लाख रुपयांना देण्याचा हा प्रकार अत्यंत गंभीर असून, ती जनतेच्या पैशाची मोठी लूट आहे, असे ते म्हणाले.

त्यामुळे छत्रपती संभाजीनगरप्रमाणेच पिंपरीच्याही या घोटाळ्याची सखोल चौकशी करण्यासाठी हे प्रकरण `ईडी` कडे सोपवावे, अशी मागणी त्यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे आज केली.

बी.जी. शिर्केसारख्या नामवंत कंस्ट्रक्शन कंपन्या राज्यात असताना पिंपरी पालिकेच्या डुडुळगाव येथील पंतप्रधान आवास योजनेच्या निविदेत फक्त दोनच आणि त्याही गुजरातच्या ठेकेदारांनीच सहभागी होणे आणि त्यातील शांती कंन्ट्रक्शनला हे काम मिळणे हेच मुळी संशयास्पद असल्याचा दावा, गव्हाणेंनी केला आहे.

निविदा देताना स्पर्धा झालीच नाही, असे सांगत दोन्ही ठेकेदार कंपन्या अगदी ठरल्याप्रमाणे दर कोट करतात, हे खूप गंभीर आणि संशयास्पद आहे, असे ते म्हणाले. प्रशासनाला त्यात काहीच गैर वाटत नाही, हे संशयाला पुष्टी देणारे आहे.

प्रशासकीय राजवटसुध्दा भाजप नेत्यांच्या तालावर निर्णय घेत असून ते ही या घोटाळ्यात सहभागी असल्याचा हल्लाबोल त्यांनी केला.

भाजप राजवटीत अशा प्रकारे बहुतांश प्रकल्पांच्या निविदा अव्वाच्या सव्वा जादा दराने आल्याची अनेक प्रकरणे समोर आली आहेत,याकडे त्यांनी लक्ष वेधले.

### प्रशासनाला काहीच गैर वाटत नाही...

**» निविदा देताना स्पर्धा झालीच नाही, असे सांगत दोन्ही ठेकेदार कंपन्या अगदी ठरल्याप्रमाणे दर कोट करतात, हे खूप गंभीर आणि संशयास्पद आहे, असे ते म्हणाले. प्रशासनाला त्यात काहीच गैर वाटत नाही, हे संशयाला पुष्टी देणारे आहे. प्रशासकीय राजवटसुध्दा भाजप नेत्यांच्या तालावर निर्णय घेत असून ते ही या घोटाळ्यात सहभागी असल्याचा हल्लाबोल त्यांनी केला.**

---

## शॉर्ट न्यूज

### पिंपरी-चिंचवड हादरलं! रिक्षाचालकाचा खून



**पिंपरी चिंचवड** : रस्त्यावर पार्क केलेल्या ऑटो रिक्षा रिक्षामध्ये चाळे करणाऱ्या प्रेमी युगलाला हटकल्यामुळे पिंपळे गुरव मधील एका रिक्षा चालकाचा खून केल्याचा धक्कादायक प्रकरा समोर आला आहे. दापोडीतील गणेश नगर भागामध्ये हा प्रकार घडला आहे. या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे.

आज संध्याकाळी साडेपाच वाजता दरम्यान दापोडीतील गणेश नगर परिसरात हा धक्कादायक प्रकार घडला. खून झालेसल्या रिक्षाचालकाचं नाव अलीम इस्माईल शेख (वय 45) असे असून अलीम इस्माईल शेख खून प्रकरणात दोन आरोपींना भोसरी पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

## संपादकीय

# शून्यातून विकासाची संधी!

***कुऱ्हाडीचा दांडा, गोतास काळ अशी म्हण आहे. मानववंश म्हणून आपण सर्वांनी विकासवादाच्या रुपात उगारलेला कुऱ्हाडीचा दांडा आपल्या गणगोतासाठी काळ ठरून पुढे ठाकला आहे. औद्योगीकरणपश्चात जगाने निवडलेल्या मार्गांवरून प्रगतीची पावले टाकताना शाश्वत विकास साधण्याऐवजी आपण विनाशाकडे जाण्याचा धोका हवामान बदलांच्या (क्लायमेट चेंज) दुष्परिणामांच्या रुपात आता दिसू लागला आहे.***

परतीचे दोर कापले जाण्यापूर्वी ही विकासवाट नव्या वळणावर नेण्याची गरज आहे. एकीकडे २०२२ हे वर्ष आजवरच्या सर्वाधिक कर्बोत्सर्गाला कारणीभूत ठरले. दुसरीकडे तापमान नोंदीच्या १२२वर्षांच्या इतिहासातील सर्वाधिक तप्त फेब्रुवारी यंदा भारतीयांनी अनुभवला. गेल्या दशकात अतिवृष्टीमुळे आपल्या देशाचे वार्षिक तीन अब्ज डॉलर नुकसान होत आहे. थोडक्यात सांगायचे, तर हवामानबदल आपल्या आयुष्याची दिशा नक्कीच बदलत आहे. विकासासाठी ऊर्जास्रोतांचा आणि ऊर्जेसाठी खनिज स्रोतांचा भरमसाट वापर हा कार्बन डायऑक्साइडसह अन्य हरितगृह वायूंच्या उत्सर्जनाला व पर्यायाने हवामान बदलांना कारणीभूत ठरत आहे. यावर तातडीचे शाश्वत उपाय गरजेचे आहेत. त्याचाच भाग म्हणून कर्बभाररहीत स्थिती (नेट झिरो) गाठण्यासाठी जगभरातील देश कार्यरत आहेत.

### अपेक्षित उपाययोजना

हवामान बदलांचे दुष्परिणाम आणि त्यांवरील उपाय यांवर चर्चेसाठी संयुक्त राष्ट्रांच्या अधिपत्याखाली गेल्या शतकाच्या अखेरच्या दशकापासून जागतिक परिषदा (कॉप) होताहेत. हवामान बदलामुळे भविष्यातले अनर्थ टाळायचे असतील तर जागतिक तापमानवाढ औद्योगिकीकरणापूर्वीच्या तुलनेत १.५ अंश सेल्सिअसपर्यंत नियंत्रित ठेवणे अत्यावश्यक आहे. पॅरिसमध्ये २०१५मध्ये आयोजित अशा परिषदेत १९६ देशांनी हवामान बदल रोखण्यासाठीच्या उपायांवर सहमती दर्शवली. त्यानुसार, हरितगृह वायू उत्सर्जन २०३०अखेर ४५ टक्क्यांनी घटवण्याचे आणि २०५०पर्यंत त्याचे नक्त प्रमाण शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट आहे. कर्बोत्सर्ग आणि कर्बशोषण दोन्ही समप्रमाणात आणणे असा या उद्दिष्टाचा अर्थ आहे.

# नाती हळुवार राहिलीत का ?




परवा एक नात्यातील मुलगी लग्नानंतर दुसऱ्यांदा वर्षभराने माहेरी आली,पहिल्यांदा आली तेव्हा चेहरा प्रसन्न,गालांवर गुलाबी दिसली .आता मात्र तिचा चेहरा निस्तेज होता,नवरा,सासू,एकूणच सासरबद्दल चकार शब्दही काढत नव्हती. तात्काळ फरक मला जाणवला , मागच्या चकरात सासरविषयी प्रामुख्याने नवऱ्याच्या बाबत भरभरून बोलणारी ,आपण बोअर होतोय याकडे दुर्लक्ष करूनही त्याचे कौतुक सांगणारी यावेळी काहीच कसा उल्लेख करीत नाही ? याचे नवल वाटले ,कुछ तो गडबड है हे माझ्या लक्षात आले. तीन दिवस झाले तरी तिचा पाय सासरी जायला निघत नाही .एरवी दिवसातून दोनवेळा नवऱ्याची येणारी रिंगटोन ऐकायला मिळत नाही याची चाहूल आई नावाच्या काळजीला सर्वात प्रथम लागते तशी ती लागली मात्र आई सुद्धा स्त्रीच असते,तिच्याही मर्यादा आपणच पुरुषांनी ठरवून टाकल्या आहेत. लग्नानंतर किंवा आधीही मुलगी प्रकरण हाताळण्यात बाप नावाचा कुटुंबप्रमुख अपयशी ठरला की " हे सगळे तुझ्या लाडाचे परिणाम आहेत " हे शब्द फेकून तो मोकळा होतो.

नवरा मला वेळच देत नाही,तो सतत आईच्या अवतीभोवती घुटमळत असतो,त्याच्या चार वाक्यात एकदा तरी आई हा शब्द असतो,भाजीला साजूक तुपातली फोडणी दिली तरी हा कधीच तारीफ करीत नाही उलट " आईच्या हातच्या भाजीची चवच न्यारी " असे वार माझ्यावर करीत असतो. त्याच्या आईने घरात अन कॉलनीतही गाऊन घालून बेल टाकले तरी चालते मात्र त्याच्या सोबत कुठे बाहेर जाताना मी डोक्यावर पदर घेऊन साडीतच गेले पाहिजे असा त्याचा हुकूम असतो. अश्या तक्रारींची मोठी जंत्री तिने वाचली. अश्या असंख्य कारणावरून आमच्यात गेल्या तीन महिन्यात अनेक चकमकी उडाल्या ,तो अतिशय क्रूर वागतो,त्याचे अनेक शब्द तेजाब सारखे मला जाळणारे असतात. झक मारली अन त्याला होकार दिला असे वाटायला लागले आहे असे सांगून ती रडायला लागली. आता त्याचे तोंडही बघण्याची माझी इच्छा नसल्याचा लास्ट स्ट्रोक तिने मारला.

उच्चशिक्षित अन उत्तम साहित्य,सांस्कृतिक भान असणारी ही मुलगी टिपिकल बायको बनून उन्मळून पडते तेव्हा मला प्रश्न पडतो की ही तीच आहे का ? जी कॉलेजच्या वादविवाद स्पर्धेत पुरुषी अहंकार उलगडून सांगते अन त्याच्याशी मुलींनी कसे लढायचे याचा मंत्र देते. मध्येच कुणाचे तरी शब्द कानावर पडतात,भाषणे अन लेखातून दुसऱ्यांना अक्कल वाटणे सोपे असते ,जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे. पुढे तीन दिवस तिचे समुपदेशन केल्यावर कुठे ती सासरी जायला तयार झाली ,तिच्या नवऱ्याशी जरा फ्रेंडली बोललो,त्यानेही साचलेले सगळे बाहेर काढले. तुम्हाला सांगतो,हे साचलेपण कुणावर तरी रिते करायला जवळचा कुणीतरी आपल्या कुटुंबात असला पाहिजे. नाहीतर साचलेपण असंख्य आजारांना निमंत्रण देते त्यात मनाचे आजार संख्येने अधिक असण्याची शक्यता असते. लग्न कांदेपोहे टाईप असो की प्रेमविवाह असो काही जुजबी गोष्टी पालक अन मुलींनीही समजून घेण्याची गरज आहे.

आपण सगळेच टिपिकल बाबा,पप्पा मटेरियल असतो,आपल्या परीला हाताच्या फोडासारखे काळजी घेत वाढवतो. काळ बदलला तरी आपण तिच्या स्वप्नातील राजकुमाराला गोंजारतो,तिच्या फॅण्टसीला खतपाणी घालत असतो. प्रत्यक्षात वास्तव मात्र भयंकर वेगळे आहे याची तिला जाणीव नसते. सिनेमा,कथा,कादंबऱ्या यातून ज्या हळुवार नात्यांची कल्पना ती गोंजारत असते तो आता " बाबा आदम "चा काळ झाला हे तिच्या गावीही नसते. लग्न होऊन ती सासरी गेल्यावर स्वप्नातला राजकुमार टिपिकल नवऱ्याच्या रूपात पुढे येतो. टीव्ही मालिकेतील



प्रेमळ आई खाष्ट सासूच्या रूपात वागणूक,टोमणे अन माहेरच्या लोकांचा उद्धार करीत तिच्या स्वप्नांना काडी लावते तेव्हा अवघ्या काही दिवसात ही पप्पांची परी कोसळून जाते. आता तिला सांगावे लागेल की लग्न हा संस्कार असला तरी ती तडजोड असते ,दोघांनीही एकमेकांचे गुण ,अवगुण स्वीकारत पुढे जायला हवे.

थोडक्यात आताच्या काळात पालकांनी आपल्या मुली रफ अँड टफ बनवायला हव्यात. जरा कुठे मनावेगळी गोष्ट घडली की डोळ्यातून गंगा,यमुना वाहणाऱ्या मुली आणि भावनिक बनणाऱ्या मुली नकोत. त्यांना जगाच्या बऱ्या,वाईट गोष्टींची जाणीव करून द्यायला हवी. " ही ना फारच हळवी आहे ! " या वाक्यातून तिची कमजोरी नका दाखवत जाऊ. तिच्या संस्कारक्षम वयातच " मेरी बेटी कमजोर नही ,वो किसी से भी लड सकती है " असे सकारात्मक संस्कार करायला हवेत. मागच्या आठवड्यात सहज नेटवर सर्च करताना लग्नाच्या पहिल्या वर्षात काडीमोड होणाऱ्या मुलींची आकडेवारी बघितली आणि माझ्या काळजात चर्रर्र झाले. अतिशय शुल्लक कारणावरूनआपला संसार उध्वस्त करणाऱ्या मुली आणि दुसऱ्या बाजूने बहिणीची काळजी

# मुले ही अनुकरणप्रिय असतात

**"मुले हे अनुकरणप्रिय असतात, हे आपण जाणतो व घरात ते अनुभवतो आणि बघतो देखील. समजा, एकत्र कुटुंबात मुले वावरत असतील तर बरेच वेळा आजोबा, वडील किंवा काका यांना जर व्यसनाची सवय असेल म्हणजेच तंबाखू, सिगारेट, दारू पिणे, गुटखा खाणे यापैकी कोणतीही सवय असेल तर घरातील मंडळी ही मुलांसमोर या खाण्यापिण्याच्या क्रिया करत असतात.**

तेव्हाच कळत-नकळतपणे हा सारा प्रकार मुले अगदी जवळून बघत असतात. इतकेच नाही तर ते बघून मनात साठवत देखील असतात. यातून त्यांना नकळतपणे प्रेरणाच मिळत असते. तेव्हा या गोष्टी मुलांदेखत होणार नाही, याची खबरदारी पालकांनी घेतली पाहिजे किंवा ही गोष्ट मुलांसमोर करू नये हे पालकांनी मनाशी ठरवले पाहिजे. त्याची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे, हे जाणले पाहिजे." - माधुरी केवळराव पाटील, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोडाळे (ता. इगतपुरी, जि. नाशिक)

आपण हे सारे अनुभवले आहे, ऐकले देखील आहे, की आपण लहान मुलांना जेव्हा घरात जेव्हा खेळवत असतो तेव्हा त्यांना शिकवत देखील असतो. उदाहरण द्यायचेच म्हटले, तर आपण मुलांना छोटे छोटे प्रश्न विचारतो.

बाळा तुझे नाक दाखव? तुझे तोंड दाखव? तुझे कान, डोळे, हात, पाय, डोके,



दात, जीभ दाखव? इतकेच नाही, तर त्याचबरोबर आजोबा कसे चालतात रे? आजोबांचे डोळे कसे आहेत? आजोबा तंबाखू कसे खातात? काका सिगारेट कशी पितात? दादा गुटखा कसा खातो? आणि बाबा दारू पिल्यावर कसे करतात? मुले या सर्व प्रश्नांची उत्तरे अगदी त्याच तालात करून दाखवतात किंबहुना देतात. तेव्हा त्यांच्या त्या छोट्या छोट्या क्रिया पाहून आपल्याला त्यांचं कौतुक वाटतं, आपल्याला हसूदेखील येतं असतं.

आपल्याला एकप्रकारे नवल वाटते. आपण बोलूनही जातो वा! किती हुशार आहे बाळ अगदी बरोबर लक्षात ठेवतो आणि तसेच करतो. पण याच क्रिया तो यापुढेही कायमस्वरूपी लक्षात ठेवतो आणि याच गोष्टी करण्याची धडपड करतो, हे आपण लक्षात घेतच नाही.

तेव्हा आपण मुलांना असे प्रश्न न विचारता त्याला त्याच्या बालबुद्धीला त्यातून संस्कार मिळतील असे प्रश्न विचारा. थोरांच्या गोष्टी सांगितल्या जाव्यात, म्हणजे प्रत्येक घरातून शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, पंडित नेहरू असे अनेक थोर नेते घडतील आणि येणाऱ्या भावी पिढीचा या देशासाठी नक्कीच उपयोग होईल.नोकरीत अनेक अनुभव रोज अनुभवायला मिळतात. जेव्हा मुले सतत गैरहजर असतात आणि अचानकपणे पुन्हा कधीतरी शाळेत येतात, तेव्हा जर का या मुलांना विचारले, का रे बाळा!

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# खेडमध्ये एकनाथ शिंदेंचा ठाकरेंवर घणाघात!



## “उद्धव ठाकरे मातोश्रीचे दरवाजे उघडेच ठेवा कारण सगळे जातील

। खेड । महाईन्यूज ।

**मी जेव्हा बंड केलं तेव्हा २० आमदार उद्धव ठाकरेंना भेटायला गेले होते. त्यांनी सांगितलं की यातून मार्ग काढा. राष्ट्रवादी काँग्रेसची साथ सोडा. त्यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले? ज्यांना जायचं आहे त्यांनी जा मातोश्रीचे दरवाजे उघडे आहेत. दरवाजे उघडेच ठेवा. कारण सगळे जातील शेवटी तुम्हीच राहाल. हम दो हमारे दो. माझं कुटुंब माझी जबाबदारी एवढंच राहिल. मी हे बोलतोय कारण आम्ही हे सगळं भोगलं आहे. असं म्हणत आज खेडच्या मैदानात उद्धव ठाकरेंवर घणाघाती टीका केली. स्वार्थ जेव्हा माणसाच्या डोक्यात जातो, सत्तेची हवा डोक्यात जाते तेव्हा त्याला काहीच सुचत नाही. असंही एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे**

### कार्यकर्ता मोठा होतो तेव्हाच पक्ष मोठा होतो

जेव्हा कार्यकर्ता मोठा होतो तेव्हाच पक्ष मोठा होतो. मात्र कार्यकर्ता मोठा होऊ लागला की तुम्हाला (उद्धव ठाकरे) पोटदुखी होऊ लागते. संकुचित विचारांनी पक्ष वाढत नसतो असंही एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. रामदास कदम यांच्या भाषणाला टाळ्या पडतात, गुलाबराव पाटील यांच्या भाषणाला टाळ्या पडतात म्हणून तुम्ही त्यांची भाषणं बंद केलीत. संकुचितपणाचा कळस आहे.

उद्धव ठाकरेंनी सत्तेसाठी धनुष्यबाण आणि शिवसेना हा पक्ष काँग्रेस राष्ट्रवादीकडे गहाण ठेवला होता तो आम्ही सोडवला. निवडणूक आयोगानेही याच न्यायाने आम्हाला चिन्ह आणि पक्ष दिला आहे असंही एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. निवडणूक आयोगाने दिलेला निर्णय म्हणजेच बाळासाहेब ठाकरेंचा आशीर्वाद आपल्यासोबत आहे. आज आपल्याला चिंता करण्याची आवश्यकता नाही असंही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे खेडमधल्या सभेत म्हटलं आहे. एकनाथ शिंदे यांनी खेडच्या गोळीबार मैदानात सभा घेतली. या सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंच्या आरोपांना उत्तर दिलं.

### राहुल गांधी सावरकर यांच्यावर बोलतात तुम्ही गप्प का?

राहुल गांधी वारंवार स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान करतात त्याच्यावर आपण मूग गिळून गप्प बसता. तुमच्यावर तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करण्याची वेळ का येते? असाही सवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विचारला आहे. तसंच हे कसलं तुमचं हिंदुत्व आहे? खोके-खोके, गद्दार-गद्दार म्हणून तुम्ही तुमचं पाप झाकत आहात. बाळासाहेब ठाकरे तुमचे वडील होते हे आम्हाला मान्य आहे सगळ्या जगाला मान्य आहे. मात्र बाळासाहेब ठाकरे हे आमचं दैवत होतं. तुम्ही त्यांना वडील वडील म्हणून छोटं करू नका, संकुचित करू नका असंही एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

### बाळासाहेबांच्या विचारांचे वारस आम्ही आहोत

» बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांचे वारस म्हणून आपण शिवसेना पुढे नेत आहोत आणि वाढवत आहोत. शिवसेनेला डाग लावू द्यायचा नाही. मी यापूर्वीही सांगितलं आहे हजारवेळा सांगेन गद्दारी आम्ही नाही केली.

» गद्दारी २०१९ ला झाली. हिंदुत्वाचं राजकारण केलं ही चूक झाली हे उद्धवजींनी विधानसभेत सांगितलं. बाळासाहेबांच्या हिंदुत्त्वाच्या विचारांना तुम्ही चुकीचं ठरवलं कशासाठी तर सत्तेसाठी? यापेक्षा महाराष्ट्राचं दुर्दैव काय असू शकतं? हिंदुत्वाशी गद्दारी आम्ही नाही तर तुम्ही केली.

### बाळासाहेब ठाकरेंचं स्वप्न मोदींनी पूर्ण केलं

» देशातलं ३७० कलम हटवणं आणि राम मंदिर उभं राहणं हे बाळासाहेब ठाकरेंचं स्वप्न होतं. हे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी पूर्ण केलं. आम्ही ५० लोकांनी जो निर्णय घेतला यांच्यासोबत घेतला तो यासाठीच घेतला. या राज्यात किंवा राज्याच्या बाहेर एकनाथ शिंदे जिथे जातो तिथे लोक आशीर्वाद द्यायला लोक उभे असतात. आम्ही राज्याच्या हिताची भूमिका घेतली. त्यामुळेच खेडचं हे मैदान तुडुंब भरून वाहतं आहे असंही एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

---

# अरे देवा! पुन्हा अवकाळी, वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा!

। मुंबई। महाईन्यूज ।

गुलाबी थंडीनंतर उकाड्याचा उन्हाळा येणार या चिंतेत असतानाच राज्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली. गेल्या काही दिवसांत राज्यात अनेक ठिकाणी हलक्या सरींनी तर काही ठिकाणी गारपिटीसह जोरदार पाऊस झाला. मार्च महिन्यात आलेल्या अवकाळीमुळे शेतकऱ्यांना मेहनतीने कष्ट करुन पिकवलेल्या सोन्यासारख्या धान्यावर पाणी सोडावं लागलं. शेतकऱ्यांना गारपिटीचा मोठा तडाखा बसलाय. असं असताना आणखी काही दिवस शेतकऱ्यांवर अवकाळीचं संकट घोंगावणार असल्याचं चित्र दिसतंय. कारण पुढील काही दिवस पुन्हा अवकाळी पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने दिलाय.

महाराष्ट्र राज्यात पुन्हा पावसाचा ‘यलो अलर्ट’ देण्यात आला आहे. वादळी पावसाचा इशारा देत मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस होणार असल्याची माहिती



हवामान खात्याकडून देण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्रातील नाशिक आणि नगर जिल्ह्यात ढगांच्या गडगडाटासह मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि वादळी वाऱ्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. तर मराठवाड्यातही हिंगोली, नांदेड, लातूर या जिल्ह्यात मध्यम स्वरूपात पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भातील अकोला, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यात गारपिठ आणि वादळी पाऊस होण्याची शक्यता आहे.गेल्या काही दिवसात झालेल्या अवकाळी पावसामुळे राज्यभरात सर्वत्र ऊन आणि नंतर ढगाळ वातावरण दिसून येत आहे. कोकण, गोवा, उत्तर-मध्य आणि दक्षिण-मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असल्याचा अंदाज वेधशाळेने वर्तविला आहे.

# अवकाळीमुळे मराठवाड्यात आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू!

## » 62 हजार 480 हेक्टर पिकांचे नुकसान

। मराठवाडा । महाईन्यूज ।

**राज्यात झालेल्या अवकाळी पावसाचा फटका मराठवाड्यातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात बसताना पाहायला मिळत आहे. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यात 62 हजार 480 हेक्टरवरील पिकांचे अवकाळी पावसामुळे नुकसान झाले आहेत. तर याच अवकाळी पावसामुळे विभागात वेगवेगळ्या दुर्घटनेत सहा लोकांचा मृत्यू झाला असून, 36 जण जखमी झाले आहेत. तसेच 76 लहान-मोठी जनावरे दगावली आहेत. गेल्या 24 तासात सरासरी 10. 44 मिलिमीटर पावसाची नोंद विभागात झाली आहे. विशेष म्हणजे मराठवाड्यात झालेल्या नुकसानीचा आकडा 33 टक्क्यांपेक्षा अधिक आहे.**

अवकाळी पावसामुळे सर्वाधिक फटका मराठवाड्यातील शेतकऱ्यांना बसला आहे. 1 मार्च ते 19 मार्च दरम्यान मराठवाड्यात एकूण 62 हजार 480 हेक्टरचे नुकसान झाले आहे. ज्यात सर्वाधिक नुकसान नांदेड जिल्ह्यात झाल्याचे पाहायला मिळत आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील 9 हजार 314 शेतकऱ्यांचे एकूण 7 हजार 762.50 हेक्टरवरील पीकांचे नुकसान झाले आहे. परभणी जिल्ह्यातील 4 हजार 500 शेतकऱ्यांचे एकूण 2 हजार 400 हेक्टरवरील पीकांचे नुकसान झाले आहे. हिंगोली जिल्ह्यातील 13 हजार 286 शेतकऱ्यांचे एकूण 5 हजार 604 हेक्टरवरील पीकांचे नुकसान झाले आहे. सर्वाधिक नुकसान झालेल्या नांदेड जिल्ह्यातील 19 हजार 899 शेतकऱ्यांचे एकूण 23 हजार 554 हेक्टरवरील पीकांचे नुकसान झाले आहे.

हिंगोली जिल्ह्यातील 13 हजार 286 शेतकऱ्यांचे एकूण 5 हजार 604 हेक्टरवरील पीकांचे नुकसान झाले आहे.



### पंचनामे रखडले!

» अवकाळी पावसामुळे मराठवाड्यातील 62 हजार 480 हेक्टरचे नुकसान झाले आहे. मात्र असे असताना प्रशासनाकडून पंचनामे होताना दिसत नसल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. जुनी पेन्शनच्या मागणीसाठी शासकीय कर्मचाऱ्यांनी संपाची हाक दिली आहे. त्यामुळे या संपात तलाठी, मंडळ अधिकाऱ्यांसह इतर महसूल कर्मचारी सहभागी आहेत. त्यामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे होत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे वेळेवर पंचनामे न झाल्यास याचा फटका शेतकऱ्यांना बसणार आहे. तसेच वेळेत नुकसानभरपाई देखील मिळणार नाही.

# भाजपला धोक्याची घंटा!

## विरोधी पक्ष 325 जागा जिंकतील; सीएसडीएसचा फॉर्म्युला

**। नवी दिल्ली । महाईन्यूज ।**

**पुढच्या वर्षी देशात लोकसभेच्या निवडणुका होतील. या निवडणुकांसाठी आता केवळ एक वर्ष बाकी आहे. येत्या निवडणुकीसाठी भाजप, काँग्रेस आणि इतर सर्वच पक्षांनी तयारी सुरु केली आहे. सध्या जेवढे सर्वे येत आहेत त्यामध्ये भाजपलाच बहुमत मिळेल, असं दिसतंय.**

देशामध्ये भाजप तिसऱ्यांदा सत्तेत येईल, असं सांगितलं जात आहे. परंतु एक फॉर्म्युला असा आहे ज्यामुळे विरोधकांना सहजगत्या सत्ता मिळू शकते. परंतु तो रस्ता खूप अवघड आणि अनिश्चित आहे.

निवडणुकांवर अभ्यास करणाऱ्या सीएसडीएस या संस्थेच्या वतीने एक आकडेवारी जारी करण्यात आली आहे. भाजपला सोडून सगळे पक्ष एकत्र आले तर येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत मोठं यश मिळू शकतं. CSDS ने हा आकडा मागच्या वर्षी सर्व पक्षांना मिळालेल्या मतांच्या टक्केवारीवरुन काढला आहे.

भाजप विरोधामध्ये जर सर्व पक्ष एकत्र आले तर भाजपला २३५ ते २४० जागांवर समाधान मानावं लागेल. दुसरीकडे विरोधी पक्षांना ३०० ते ३०५ जागा मिळू शकतात. विशेष म्हणजे २०१९ मध्ये भाजपला ३०३ जागाांवर विजय मिळाला होता तर विरोधकांना २३६ जागांवर समाधान मानावं लागलं होतं.

सीएसडीएसने मागच्या लोकसभा निवडणुकीत भाजप आणि इतर पक्षांच्या मतांच्या टक्केवारीवरुन हा आकडा काढला आहे. यासह येत्या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या मतांमध्ये एक टक्का घसरण होऊ शकते. त्यामुळे जागा कमी होऊन २२५-२३० पर्यंत खाली येऊ शकतात. तर विरोधी पक्षांना ३१०-३२५ जागा जिंकता येऊ शकतात.

जर भाजपचे दोन टक्के मतं कमी झाले तर त्यांच्या जागा २१० ते २१५ पर्यंत खाली येऊ शकतात. तर विरोधी पक्षांचा आकडा ३२५ ते ३३० होऊ शकतो. DSDSच्या या आकडेवारीमुळे विरोधकांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. त्यासाठी भाजपवगळून इतर पक्षांना एकत्र यावं लागेल, हेही तितकंच खरं.



### सीएसडीएस या संस्थेच्या वतीने आकडेवारी जारी

**»निवडणुकांवर अभ्यास करणाऱ्या सीएसडीएस या संस्थेच्या वतीने एक आकडेवारी जारी करण्यात आली आहे. भाजपला सोडून सगळे पक्ष एकत्र आले तर येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत मोठं यश मिळू शकतं. CSDS ने हा आकडा मागच्या वर्षी सर्व पक्षांना मिळालेल्या मतांच्या टक्केवारीवरुन काढला आहे. आहे. भाजप विरोधामध्ये जर सर्व पक्ष एकत्र आले तर भाजपला २३५ ते २४० जागांवर समाधान मानावं लागेल. दुसरीकडे विरोधी पक्षांना ३०० ते ३०५ जागा मिळू शकतात. विशेष म्हणजे २०१९ मध्ये भाजपला ३०३ जागाांवर विजय मिळाला होता तर विरोधकांना २३६ जागांवर समाधान मानावं लागलं होतं.**

# 'पंजाबने खूप सहन केलं, पण आता नाही!

## अकाल तख्तचा इशारा

**। नवी दिल्ली । महाईन्यूज ।**



खलिस्तान समर्थक नेता अमृतपाल सिंग याला अटक करण्यासाठी पंजाब पोलिसांनी मोठी मोहीम सुरू केल्यानंतर शिख बांधवांची सर्वोच्च संस्था अकाल तख्तचे जत्थेदार ज्ञानी हरप्रीत सिंग यांनी आज राज्यात दहशतीचे वातावरण निर्माण करू देऊ नये, असे आवाहन सरकारला केले. पंजाबला आधीच खूप त्रास सहन करावा लागला आहे. आता चांगल्या भविष्याकडे वाटचाल करण्याची वेळ आल्याचं ते म्हणाले.

पंजाबला यापूर्वी अनेक खोल जखमा झाल्या असून त्या भरून काढण्यासाठी कोणत्याही सरकारने पावले उचलली नाहीत. यापूर्वी सरकारने केलेल्या भेदभावामुळे शीख तरुणांमध्ये प्रचंड असंतोष होता. काही लोक अजुनही तरुणांचे ब्रेनवॉश करून त्यांचा वापर राजकीय फायद्यासाठी करत असल्याचा दावा त्यांनी केला.

दरम्यान चुकांपासून धडा घेत शिखांचे धार्मिक, राजकीय आणि आर्थिक प्रश्न सोपे केले पाहिजेत आणि शिखांमधील अलिप्ततेची भावना दूर केली पाहिजे, असे सिंग म्हणाले. वेळोवेळी होणाऱ्या भेदभावामुळे भारताच्या स्वातंत्र्यासाठी सर्वाधिक बलिदान देणाऱ्या शिखांमध्ये अलिप्ततेची भावना निर्माण झाली आहे.

### तरुणांमध्ये प्रचंड असंतोष

**» पंजाबला यापूर्वी अनेक खोल जखमा झाल्या असून त्या भरून काढण्यासाठी कोणत्याही सरकारने पावले उचलली नाहीत. यापूर्वी सरकारने केलेल्या भेदभावामुळे शीख तरुणांमध्ये प्रचंड असंतोष होता.**

## शॉर्ट न्यूज

### बांगलादेशात अपघातः 17 ठार

**ढाका ।** बांगलादेशमध्ये रविवारी बस दरीत कोसळल्याने 17 जणांचा मृत्यू तर 30 जखमी झाले आहेत. मदारीपूरमध्ये ही घटना घडली. ही बस इमाद परिवहनची असल्याचे पोलिसांनी सांगितले. ढाकाकडे जाणारी ही बस सकाळी साडेसातच्या सुमारास मदारीपूर येथील एक्स्प्रेस वेवर नियंत्रणाबाहेर गेली आणि दरीत कोसळली. या अपघातात आतापर्यंत 17 जणांचा मृत्यू झाला आहे, तर 30 जण जखमी झाले आहेत.

### पंकजा मुंडे मैदानात

**बीड :** भाजप नेत्या पंकजा मुंडे 2024 विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुन्हा मैदानात उतरल्या आहेत. बैठकांमधून लोकांशी जोडून घेण्याचा त्या प्रयत्न करत आहेत. आज बीड जिल्हा भारतीय जनता पार्टी बूथ सशक्तीकरण, जिल्हा प्रशिक्षण वर्ग व जिल्हा कार्यकारिणी बैठक मुंडे यांनी घेतली. यावेळी त्यांनी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना संबोधित केले.

# राहुल गांधींच्या पोलीस चौकशीवरुन काँग्रेस आक्रमक

## निवासस्थानाबाहेर कार्यकर्त्यांशी झटापट

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**भारत जोडो यात्रेदरम्यान केलेल्या वक्तव्यावरुन खुलासा मागण्यासाठी दिल्ली पोलिसांनी रविवारी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या निवासस्थानावर आपला मोर्चा वळविला. यावेळी काँग्रेस कार्यकर्ते आणि पोलीस दल यांच्यात चकमक उडाली.**



स्पेशल सीपी सागर प्रीत हुड्डा रविवारी पुन्हा नोटीस देण्यासाठी काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या निवासस्थानी पोहोचले होते. याआधीही 16 मार्च रोजी पोलीस नोटीस बजावण्यासाठी त्यांच्या घरी पोहोचले होते मात्र पथकाला तासनतास वाट पहावी लागली होती. राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेदरम्यान केलेल्या एका वक्तव्यामुळे त्यांना नोटीस बजावत दिल्ली पोलिसांनी त्यांना उत्तर देण्यास सांगितले आहे. काँग्रेस नेते अशोक गेहलोत, पवन खेडा आणि शक्ती सिंह गोहिल हेही त्यांची भेट घेण्यासाठी निवासस्थानी पोहोचले.

भारत जोडो यात्रेदरम्यान श्रीनगरमध्ये एका सभेला संबोधित करताना त्यांनी केलेल्या वक्तव्याबाबत माहिती घेण्यासाठी पोलीस त्याच्या घरी पोहोचले होते.

### नेमकं प्रकरण काय?

भारत जोडो यात्रेदरम्यान श्रीनगरमध्ये एका सभेला संबोधित करताना राहुल गांधी यांनी केलेल्या भाषणासंदर्भात दिल्ली पोलिसांना त्यांच्याकडून माहिती घ्यायची असल्याने त्यांनी नोटीस बजावली आहे. भारत जोडो यात्रेदरम्यान राहुल गांधींनी श्रीनगरमध्ये याबाबत भाष्य केले होते. महिलांवर अजूनही लैंगिक अत्याचार होत असल्याचं मी ऐकलं आहे.


एका प्रकरणात माझे बलात्कार झालेल्या दिल्लीतील एका मुलीशी संभाषण झाले होते. यावेळी मी तिला विचारले की, आपण पोलिसांना कॉल करुया का? त्यावर तिने घाबरत कृपया पोलिसांना कॉल करू नका, असे सांगितले, असे राहुल गांधी म्हणाले होते.

### काँग्रेस आक्रमक

**» राहुल गांधी यांच्या घराबाहेर दिल्ली पोलिसांच्या तटबंदीमुळे काँग्रेस चांगलीच आक्रमक झाली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांना भारत जोडो यात्रा संपवून 45 दिवस झाले आहेत. दिल्ली पोलीस 45 दिवसांनी चौकशीसाठी येत आहेत. त्यांना इतकी चिंता होती तर ते फेब्रुवारीत त्यांच्याकडे का गेले नाहीत? राहुल गांधी यांची कायदेशीर टीम यावर उत्तर देईल, अशी प्रतिक्रिया जयराम रमेश यांनी दिली.**

### राहुल गांधी यांनी मागितला वेळ

**» आम्ही राहुल गांधींसोबत चर्चा केली आहे. त्यांनी म्हणाला मला याबाबत थोडा वेळ हवा आहे आणि तुम्ही जी माहिती मागितली आहे ती मी तुम्हाला देईल. आमची नोटीस त्यांच्या कार्यालयाने स्वीकारली आहे आणि जर चौकशी करायची असेल तर आम्ही करू, अशी माहिती विशेष सीपी सागर प्रीत हुडा यांनी दिली.**



# राणी मुखर्जीवर जळायची तिची चुलत बहिण काजोल!

**बॉलिवूड अभिनेत्री काजोलने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर बहीण तनिषा मुखर्जी चुलत बहीण आणि अभिनेत्री राणी मुखर्जीसोबतचा एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये तिघेही ब्लॅक आउटफिटमध्ये दिसत आहेत. यासोबतच काजोलने राणीचा नुकताच प्रदर्शित झालेला 'मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे' हा चित्रपट पाहिला आणि रिव्ह्यू दिला. 'मस्ट-सी' असे तिने या चित्रपटाचे वर्णन केले आहे.**



राणी आणि काजोलमधील उत्तम बाँडिंग फोटोत पाहायला मिळते. पण एक वेळ अशी आली होती जेव्हा दोघांना एकमेकांचा चेहरा पाहणे देखील आवडत नसे. एवढेच नाही तर काजोलने राणीला सुपरहिट चित्रपट 'कुछ कुछ होता है' या चित्रपटातून काढून टाकण्याचा प्रयत्न केला होता.

राणी मुखर्जीने बॉलिवूडमध्ये प्रवेश केला तोपर्यंत काजोल बॉलिवूडची टॉप अभिनेत्री बनली होती. काजोल आणि राणी चुलत बहिणी आहेत. त्यांचे वडील शोमू मुखर्जी आणि राम मुखर्जी चुलत भाऊ होते.

लोकांना वाटले की काजोल चुलत बहीण राणीला मदत करेल आणि तिला इंडस्ट्रीत मार्गदर्शन करेल. पण असे कधीच झाले नाही. उलट काजोलने तिच्या मार्गात अडथळे आणले.

काजोल आणि राणी मुखर्जी यांच्यातील मतभेदाचे कारण म्हणजे गेल्या अनेक वर्षांपासून दोन्ही कुटुंबात संपत्तीचा वाद सुरू होता. दोघांमधील संघर्ष तेव्हा वाढला जेव्हा यशराज फिल्म्सची आणि दिवंगत यश चोप्रा यांची आवडती अभिनेत्री काजोलची जागा राणी मुखर्जीने घेतली. यश चोप्रा यांचा मुलगा आदित्य चोप्रा बोर्डात आल्यानंतर राणी मुखर्जी यशराज फिल्म्सची नवीन आवडती

# छा गयी! भर स्टेजवर रेखाजींनी आपला पुरस्कार आलियाला समर्पित केला!



आलिया भटला सध्याच्या आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक आहे. आलिया भटला काहीच दिवसांपूर्वी दादासाहेब फाळके अवॉर्ड मिळाला. ज्येष्ठ अभिनेत्री रेखाच्या हस्ते आलियाला पुरस्कार मिळाला.

रेखा कायमच नवोदित कलाकारांचं कौतुक करताना दिसतात. त्यांच्या कामाची प्रशंसा करतात. अशातच रेखाजींनी आलिया सोबत दादासाहेब फाळके पुरस्कारात एक अशी गोष्ट केलीय ती चर्चेत आहे.

नुकतंच दादासाहेब फाळके पुरस्कार सोहळ्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झालाय. या अवॉर्ड इव्हेंटमधील व्हिडिओ क्लिपमध्ये आलिया आणि रेखा पांढऱ्या साड्यांमध्ये स्टेज शेअर करताना दिसत आहेत. रेखा स्टेजवर आली तेव्हा आलियाच्या हातात ट्रॉफी होती.

तेव्हा रेखाजी सर्वासमोर आलियाला म्हणाल्या, "मी आजचा माझा पुरस्कार आपल्या देशातल्या भावी दिग्गजांना समर्पित करते आणि आलिया याची सुरुवात आहे." असं रेखाजी म्हणताच भारावून गेलेली आलिया जमिनीवर



कोसळून "दूर्ररर" असा आवाज करत प्रतिक्रिया देते. काहीच दिवसांपूर्वी आलियाने इंस्टाग्रामवर बथडे पार्टीचे फोटो शेअर केले आहेत, ज्यामध्ये ती केक कापताना आणि सेलिब्रेशन करताना दिसत आहे. या खास प्रसंगी तिच्यासोबत तिच्या आयुष्यातील सर्वात खास व्यक्ती म्हणजेच रणबीर कपूर देखील होता. दोघांनीही चांगला वेळ घालवला आणि आलियाने तिचा 30 वा वाढदिवस एका खास पद्धतीने साजरा केला.





# तनुश्री दत्ताने अवघ्या 20व्या वर्षी जिंकली होती 'मिस इंडिया' स्पर्धा...

बॉलिवूड अभिनेत्री तनुश्री दत्ता गेल्या काही वर्षांपासून सातत्याने चर्चेत असते. तनुश्रीचे नाव कधी मी-टू मोहिमेसाठी तर कधी न्यायालयीन खटल्यामुळे चर्चेत येत आहे. तनुश्री दत्ता आज ३९ वा वाढदिवस साजरा करत आहे. तनुश्री दत्ताने अनेक चमकदार चित्रपटांमध्ये केवळ तिच्या अभिनय कौशल्याचा प्रसार केला नाही तर 2004 साली मिस वर्ल्ड स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले. तनुश्री दत्ता एके काळी लाखो हृदयांची धडकन बनली होती. एका गाण्यामुळे ती प्रसिद्धीच्या झोतात आली होती. 'आशिक बनाया आपने' गर्ल म्हणून प्रसिद्ध असलेल्या तनुश्रीने तिच्या करिअरमध्ये अनेक चढउतार पाहिले.

तनुश्रीचा जन्म 19 मार्च 1984 रोजी झारखंडमधील जमशेदपूर येथे एका बंगाली कुटुंबात झाला.

जमशेदपूरमध्ये सुरुवातीचे शिक्षण घेतल्यानंतर ती पुण्याला गेली. तिने पुण्यात महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. यानंतर तनुश्रीने मनोरंजन विश्वाकडे वळण्याचा निर्णय घेतला. यासोबतच तिने मॉडेलिंगला सुरुवात केली. वयाच्या अवघ्या २०व्या वर्षी तनुश्री दत्ता मिस इंडिया बनली होती. इतकेच नाही तर, तनुश्री ने मिस युनिव्हर्स स्पर्धेतही देशाचे प्रतिनिधित्व केले होते. मात्र, तनुश्रीला या स्पर्धेत फक्त टॉप १०मध्येच स्थान मिळवता आले. तनुश्री दत्ताने 'आशिक बनाया आपने' चित्रपटानंतर 'चॉकलेट'मध्ये काम केले. हे दोन्ही चित्रपट 2005 मध्ये आले होते.

# ऑस्ट्रेलियाने रचला इतिहास!

## 234 चेंडू राखून ODI क्रिकेटमध्ये भारताचा केला सर्वात मोठा पराभव

। मुंबई ।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**ऑस्ट्रेलियाने हा सामना 10 विकेटने जिंकून इतिहास रचला. ज्या खेळपट्टीवर भारतीय फलंदाजांना खेळता आले नाही, तेथे ऑस्ट्रेलियन सलामी जोडीने मोठे फटके मारले. मिचेल मार्शने 66 धावांच्या खेळीत 6 षटकार लगावले. ट्रॅव्हिस हेडने 51 धावांच्या खेळीत चौकारावरून 40 धावा केल्या.**




दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताला 10 गडी राखून पराभव स्वीकारावा लागला, ही पहिली वेळ नसली तरी यावेळी भारताचा पराभव हा सर्वात मोठा आणि लाजिरवाणा आहे. ऑस्ट्रेलियाने 11 षटके खेळून लक्ष्य गाठले, तेही एकही विकेट न गमावता. उर्वरित चेंडूंवर आधारित हा सर्वात मोठा विजय आहे, जेव्हा ऑस्ट्रेलियाने 234 चेंडू शिल्लक असताना विजय मिळवला.

2019 मध्ये भारताचा 8 गडी राखून पराभव केला होता, त्या सामन्यात न्यूझीलंडचे 212 चेंडू शिल्लक होते. ऑस्ट्रेलियाने भारतावर दुसऱ्यांदा 10 गडी राखून विजय मिळवला आणि अशी कामगिरी करणारा पहिला संघ ठरला आहे. मिचेल स्टार्कने पहिल्याच षटकातच तिसऱ्या चेंडूवर शुभमन गिलला बाद करत भारताला धक्का दिला. गिलने खराब शॉट खेळला आणि पॉईंटच्या दिशेने झेलबाद झाला. पहिल्या सामन्यात जे घडले होते, त्याच पद्धतीने तो आऊट झाला.

### 26 षटकात ऑलआऊट अन् लाजिरवाणा विक्रमही

» भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील एकदिवसीय मालिकेतील दुसरा सामना विशाखापट्टणम येथे खेळला जात आहे. दुसऱ्या वनडेत रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय फलंदाज सपशेल अपयशी ठरला आहे ऑस्ट्रेलियन गोलंदाजांनी भारताचा डाव केवळ 117 धावांत गुंडाळला आहे. या सामन्यात मिचेल स्टार्कने भारतीय संघाकडून 5 विकेट घेतल्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध वनडेमधली ही भारताची तिसरी सर्वात कमी धावसंख्या आहे. 1981 मध्ये भारतीय संघ सिडनीमध्ये 63 धावा तर 2000 साली सिडनीतच 100 धावा करू शकला होता. 7 फलंदाज दुहेरी आकडा गाठू शकले नाहीत. 8व्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या अक्षर पटेलने सर्वाधिक 29 धावा केल्या. मिचेल स्टार्कने सर्वाधिक 5 विकेट घेतल्या. दुसरीकडे, सीन अ‍ॅबॉटने 3 आणि नॅथन एलिसने 2 बळी घेतले. ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाजीसमोर भारतीय फलंदाज पूर्णपणे गुडघे टेकले होते.

# आयपीएलवर कोरोनाचं संकट?

## बीसीसीआयने खेळाडूंबाबत घेतला मोठा निर्णय

। मुंबई ।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. या स्पर्धेचा 16 वा सिझन मार्च महिन्याच्या अखेरीस सुरु होत आहे. दरम्यान, एखादा खेळाडू कोरोना पॉझिटिव्ह आढळल्यास बीसीसीआयने खेळाडूंना किमान सात दिवस विलगीकरणात राहणे बंधनकारक असल्याचे जाहीर केले आहे. आयपीएलचे शेवटचे दोन हंगाम कोरोनाच्या सावटाखाली खेळवण्यात आले होते. यावेळीही आयपीएलमध्ये कोरोनाचा धोका संभावण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर खेळाडूंच्या सुरक्षेसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.**



इंडियन प्रीमियर लीग 2023 आयपीएल 2023 दरम्यान एखादा खेळाडू कोविड-19 पॉझिटिव्ह आढळल्यास, बीसीसीआयने खेळाडूंना किमान 7 दिवस विलिगकरणात राहणे बंधनकारक असल्याचे जाहीर केले आहे. आयपीएलने सांगितले की आम्हाला सावधगिरी बाळगायची आहे आणि जर या हंगामातील खेळाडू कोविड-19 पॉझिटिव्ह आढळले तर त्यांना कोणत्याही प्रकारच्या सराव किंवा कोणत्याही सामन्यात भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही. जोपर्यंत त्यांची कोविड-19 टेस्ट निगेटिव्ह येत नाही. त्यांची सर्वात लवकर अनिवार्य नकारात्मक चाचणी पुनर्प्राप्तीच्या पाचव्या दिवसापासून होऊ शकते.

ईएसपीएन क्रिकइन्फोच्या नुसार, आयपीएलसाठी वैद्यकीय मार्गदर्शक तत्त्वे असे सांगतात की, भारतात कोविड-19 प्रकरणांमध्ये घट झाली आहे. तरीही आपण नियमित अंतराने चिंतेचा विषय बनत असलेल्या उदयोन्मुख तणावाबद्दल लक्षात घेतले पाहिजे. पॉझिटिव्ह केसेस जास्तीत जास्त सात दिवसांसाठी विलीगीकरणामध्ये ठेवाव्यात. पॉझिटिव्ह केसेसना आयसोलेशनच्या काळात कोणत्याही सामन्यात किंवा कोणत्याही प्रकारच्या कार्यक्रमात भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही. पाचव्या दिवसापासून ते आरटीपीसीआर करू शकतात आणि कोणत्याही औषधाशिवाय ते 24 तास कोणतीही लक्षणे नसलेले असावेत. पहिला निगेटिव्ह रिपोर्ट आल्यावर, 24 तासांच्या अंतराने दुसरी चाचणी करावी. त्यानंतरच्या काळात व्हॉलीबॉलमध्ये सुषमा प्रधान, वैशाली फडतरे, श्यामा सारंग, तसेच राजेश गायकवाड, कबड्डीमध्ये भक्ती कुलकर्णी, अनुराधा डोणगावकर व माधुरी कुलकर्णी, बॅडमिंटनमधे ऋचा फाल्गुने, शिखा गौतम यांनी आपला एक वेगळा दबदबा या खेळात निर्माण केला होता.

### वर्ल्ड कपमध्ये सूट देण्यात आली होती

» गेल्या एका वर्षात जवळजवळ प्रत्येक क्रीडा स्पर्धांमध्ये खेळाडूंना कोरोना संसर्ग असूनही खेळण्याची परवानगी दिली जात आहे, ज्यामध्ये संक्रमित खेळाडूला खेळादरम्यान त्यांच्या सहकाऱ्यांपासून अंतर ठेवावे लागते. गेल्या वर्षी कॉमनवेल्थ गेम्समध्ये हे दाखवण्यात आले होते, तर ऑस्ट्रेलियात झालेल्या पुरुषांच्या टी-20 विश्वचषक आणि महिलांच्या टी-20 विश्वचषक स्पर्धेतही त्यांना सूट देण्यात आली होती.दिला. त्याकाळात टेबल टेनिसमध्ये (कै.) बाबा सौंदाणकार, राजा वर्टी, नंदू दामले, संजय मोडक बास्केट बॉलमध्ये सुधीर माने, अविनाश खांडेकर, स्वरांगी सहस्रबुद्धे, शुभांगी पंडित, उज्ज्वला गोठी, क्रिकेटमध्ये विंग कमांडर बाळ दाणी, राजेंद्र लेले, अन्वर शेख, रमेश वैद्य, सलिल अंकोला, बॅडमिंटनमध्ये विष्णू पाटील, राजा वर्टी अशा अनेक खेळाडूंनी सुविधा नसताना खेळात नैपुण्य दाखविले.

# जोकोविचची मियामी स्पर्धेतून माघार

। नवी दिल्ली

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**कोरोना लशीच्या मुद्द्यावरून अव्वल टेनिसपटू नोवाक जोकोविचने पुढील आठवड्यापासून सुरू होणाऱ्या मियामी ओपन स्पर्धेतून माघार घेतली आहे. कोरोना लस न घेतल्यामुळे जोकोविचला अमेरिकेत प्रवेशबंदी आहे.**

परिणामी तो मियामी स्पर्धेत खेळणार नसल्याचे स्पर्धा संचालक जेम्स ब्लेक यांनी सांगितले. जोकोविचसाठी अपवाद करावा आणि त्याला स्पर्धेत खेळता यावे, यासाठी आम्ही प्रयत्न केले; परंतु ते शक्य झाले नाही, असे ब्लेक म्हणाले. मियामी ओपन ही टेनिस क्षेत्रातील एक महत्त्वाची स्पर्धा आहे. त्यामुळे या स्पर्धेत सर्वोत्तम खेळाडूंनी खेळावे, यासाठी आम्ही प्रयत्न करत असतो. जोकोविचसाठी आम्ही सरकारलाही विनंती केली; परंतु सरकारचा निर्णय आमच्या हाती नसतो, अशी निराशा ब्लेक यांनी व्यक्त केली. मियामी ओपन स्पर्धा जोकोविचने सहा वेळा जिंकलेली आहे. सध्या कॅलिफोर्नियात सुरू असलेल्या मास्टर्स स्पर्धेतही जोकोविच कोरोना लशीच्या मुद्द्यावरूनच खेळत नाही. कोरोना लस न घेतलेल्या कोणत्याही परदेशी व्यक्तीला अमेरिकत प्रवेश दिला जात नाही. 11 मेपासून लावण्यात आलेला हा नियम अजूनही कायम आहे.

